**MHAH220002422026**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५७/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश**

[ दिनांक २३.०३.२०२६]

**बाबासाहेब तुकाराम बेरड वि. सरकार**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार बाबासाहेब तुकाराम बेरड याने भारतीय नागरीक सुरक्षा कायदा २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार हा मौजे दरेवाडी, ता. जि. अहमदनगर येथील कायमचा रहिवासी असून शेती/व्यवसाय करुन उदरनिर्वाह करतो. अर्जदार यांनी टाटा मोटर्स लिमीटेड कंपनीचे वाहन मुळ मालक श्री. गोरख नामदेव ढाकणे यांच्याकडून र.रु. १२,२१,०००/- विकत घेतले असून त्याप्रमाणे गाडीची खरेदी पावती तयार केलेली आहे. सदर गाडीवर लोन असल्यामुळे सदरची गाडी अर्जदाराच्या नावावर झालेली नाही. परंतु सदरची गाडी खरेदी पावतीच्या व्यवहारानुसार अर्जदाराच्या ताब्यात दि.१२.०९.२०२५ रोजी दिलेली आहे. अर्जदाराचे टाटा मोटर्स लिमीटेड या कंपनीच्या वाहनाचा नोंदणी क्र. MH-16-CD-1990, चॅसीस नंबर MAT563012N7A00435, इंजिन नंबर 33LNGD06AXX500452 व रंग BRICK RED आहे. अर्जदाराचे सदर वाहन पोलीस स्टेशन, कर्जत येथे गु.र.नं.५४/२०२६ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा १९६० चे कलम ३ व ११ अन्वये आणि महाराष्ट्र पशु संरक्षण कायदा १९७६ चे कलम ५(ए)(बी) चे उल्लंघनाबाबत कलम ९ अन्वये अन्वये दाखल गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले आहे. सदरकामी कर्जत पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी सदरचे वाहन जप्त करुन कर्जत पोलिस स्टेशन येथे ठेवलेले आहे. सदर वाहन

पो.ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे पार्ट खराब होणार आहेत. सदर वाहन वापरात न राहिल्यास त्यामध्ये बिघाड होणार आहे. सदर वाहन हे दैनंदिन वापरासाठी गरजेचे असून न्यायालय सांगेल त्या अटी व शर्तीचे पालन करण्यास ते तयार आहे. सबब सदरील वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि.क्र.१७ लगत दाखल करुन सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतलेली आहे. तपासी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास तो पुन्हा तशाच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरचे वाहन संपरिक्षेवेळी कोर्टासमोर उपलब्ध राहणार नाही. तसेच जप्त मालवाहतुक चारचाकी गाडी परत दिल्यास अर्जदार त्यात बदल करण्याची शक्यता आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास चालु असून आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणे बाकी आहे. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे नि.क्र.१५ लगत दाखल करुन सदर जप्त वाहनाचा ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतलेली आहे. सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या म्हणण्यानुसार प्राण्यांची वाहतूक करताना व्हेटरनरी सर्जन यांचे प्रमाणपत्र त्यांच्या सोबत नव्हते. तसेच प्राण्यांच्या वाहतुकीचा परवाना त्यांच्याकडे नव्हता. आर.सी.बुक पाहिले असता सदर वाहनाचा मालक अर्जदार नसुन ढाकणे गोरख नामदेव हा व्यक्ती आहे. सदरचे वाहन अर्जदारास परत केल्यास पुन्हा तशाच प्रकारच्या गुन्ह्यात त्याचा वापर करु शकतो. तसेच सदरच्या वाहनाच्या मालकीत अगर बाह्य स्वरुपात बदल करु शकतो. तसेच सदरचे वाहन संपरिक्षेवेळी कोर्टासमोर उपलब्ध राहणार नाही. जप्त प्राण्यांबाबत त्यांचे योग्य पालनपोषण तसेच

देखरेख, संरक्षणाबाबत योग्य तो आदेश व्हावा व अर्जदार सदर वाहनाचा मालक नसल्याने अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी हरकत घेतलेली आहे.

५. तिऱ्हाईत इसम जनजागृती सामाजिक युवा प्रतिष्ठान अंतर्गत कामधेनु गोशाळा, राशीन, ता. कर्जत तर्फे अधिकृत प्रतिनिधी अभिषेक दत्तात्रय जंजाळ यांनी म्हणणे नि.क्र.१४ दाखल करुन सदर जप्त वाहनाचा ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतलेली आहे. सदर गोशाळेच्या वतीने कथन करण्यात आले की, जप्त गोवंशाबातच्या निगा व खर्च गोशाळेस संबंधीत जनावरांचा मालक तसेच वाहनाचा मालक यांच्याकडून वसूल करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. प्रस्तुत गुन्हयात एकूण २३ गोवंश जप्त करण्यात आलेले आहेत. पोलीसांनी सदर गोवंश जप्त केल्यानंतर सदर गोशाळेच्या ताब्यात दिलेले असून तेव्हापासून सदर जप्त जनावरांच्या निगा व देखभालीसाठी गोशाळेस एकूण ३२ दिवसांचा खर्च र.रु.२,८१,६००/– झालेला आहे. सदर खर्चाची रक्कम गोशाळेस न मिळाल्यास सदर गोशाळेस नाहक नुकसान होईल. प्रस्तुत गुन्हयातील आरोपींविरुध्द अशाच प्रकारचे अन्य गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे सदर जप्त वाहनाचा ताबा अर्जदारास दिल्यास पुन्हा सदर वाहनाचा वापर अशाच प्रकारच्या गुन्हयात होण्याची दाट शक्यता आहे.

६. प्रस्तुत गुन्हयातील जप्त वाहनाचा मुळ मालक गोरख नामदेव ढाकणे आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या खरेदी पावत्यांच्या आधारे त्याला जप्त वाहनाचा ताबा मागण्याचा अधिकार नाही. तसेच सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्याबाबत न्यायालयाचे मत झाल्यास प्रस्तुत गुन्हयातील जप्त गोवंशाच्या निगा व देखभालीच्या खर्चाची संपूर्ण रक्कम गोशाळेस दिल्याशिवाय सदर वाहनाचा अंतरिम ताबा देण्यात येऊ नये. सबब, गोशाळेस प्रस्तुत गुन्हयातील जप्त गोवंशाच्या निगा व देखभालीसाठी झालेला खर्च तसेच यानंतर सदर खर्चाबाबत प्रस्तुत गुन्हयातील अंतिम निकालापर्यंत होणारी रक्कम गोशाळेस देण्याबाबत आदेश व्हावा.

७. अर्जदाराने त्याच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ पोलिस स्टेशन, कर्जत येथे दाखल गु.र.नं.५४/२०२६ ची एफ.आय.आर. ची छायांकित प्रत (नि.क्र.३/१), सदर वाहनाची आर.सी.बुकची पडताळणी प्रत (नि.क्र.३/२), अर्जदार यांनी सदर वाहन खरेदी केलेली वाहन खरेदी पावतीची पडताळणी प्रत (नि.क्र.३/३) व अर्जदाराचे स्वतःचे आधारकार्डची पडताळणी प्रत (नि.क्र.३/४) ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच प्रस्तुत अर्जाच्या सुनावणी दरम्यान सदर जप्त वाहनाचा नोंदणीकृत मालक गोरख नामदेव ढाकणे याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१८ दाखल केलेले आहे.

८. सदरील वाहन उपरोक्त गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तो जप्त वाहनाचा मालक आहे. सदर कथनाचे पुष्ठ्यर्थ त्याने वाहन खरेदीची पावती दि.१२.०९.२०२५ दाखल केलेली आहे. तसेच सदर वाहनाचा नोंदणीकृत मालक गोरख नामदेव ढाकणे याच्या कथनानुसार त्याने सदर वाहन अर्जदारास विक्री केल्याचे प्रतिज्ञापत्रावर कथन केले आहे. अर्जदाराने सदर गुन्ह्यातील वाहनाच्या आर.सी.बुकची पडताळणी प्रत दाखल केलेली आहे. त्यात नमूद वाहनाचे वर्णन अर्जदाराने अर्जात केलेल्या वर्णनाशी सुसंगत आहे. तसेच सदर वर्णनाचे वाहन पोलीसांनी गुन्ह्यात जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. त्यामुळे सकृतदर्शनी प्रस्तुत गुन्हयातील जप्त वाहनाचा मालक अर्जदार असल्याचे दिसून येते.

९. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहनाचा वापर तशाच प्रकारच्या गुन्ह्यात होण्याची शक्यता असल्याचे कथन केले आहे. सद्य स्थितीत तपासी अधिकारी यास तपासाकामी सदर वाहनाची आवश्यकता असल्याचे सकृतदर्शनी दिसत नाही. सदर वाहन जर अनिश्चित कालावधीसाठी पोलीस ठाणे येथे पडुन राहिले तर त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सकृतदर्शनी सदर वाहनाचे पोलिसांना

तपासाकामी आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही. गोशाळेच्या वतीने सदर प्रस्तुत गुन्हयातील जप्त गोवंशाच्या निगा व देखभालीसाठी झालेला खर्च गोशाळेस मिळाल्याशिवाय सदर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेण्यात आलेली आहे.

१०. सद्य स्थितीत सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या युक्तीवादानुसार जप्त जनावरांचे काळजी व निगा याबाबत योग्य त्या खर्चाचा आदेश होणे गरजेचे आहे. प्रस्तुत गुन्हयातील प्रथम खबरी अहवालाची प्रत आरोपीच्या वतीने दाखल करण्यात आलेली आहे. सदर खबरी अहवालाचे अवलोकन करता प्रस्तुत अर्जात वर्णन केलेल्या वर्णनाचे टाटा आयशर कंपनीचा क्र.एम.एच.१६.सी.डी.१९८९ या वाहनातून गावरान जातीची तीन बैल, एक खोंड व एक गाय, गिर जातीच्या तांबड्या रंगाच्या दोन गायी, जर्सी जातीच्या काळ्या पांढऱ्या रंगाच्या एकूण तिन गायी व जर्सी जातीच्या काळ्या रंगाची तीन वासरे अशा एकूण तेवीस जनावरांची वाहतूक होत असताना दिसून आली असा मजकुर नमुद आहे. तपासी अधिकारी यांनी देखील त्यांच्या जबाबात सदर वाहनात प्रथम खबरी अहवालात नमुद केल्याप्रमाणे गोवंश मिळून आल्याचे कथन केलेले आहे. अर्जदाराच्या विधिज्ञांनी तोंडी युक्तीवादात कथन केले की, सदर जप्त जनावरे अर्जदाराच्या मालकीची नाहीत. प्रथम खबरी अहवालातील मजकुरावरुन अर्जदार केवळ सदर वाहनाचा चालक असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. सदर जप्त जनावरे पोलीसांनी गोशाळेकडे काळजी व निगेसाठी दिलेली आहेत. अर्जदाराने जप्त जनावरांचा ताबा मागितलेला नाही. त्यामुळे त्यांच्या काळजी व निगेबाबतची जबाबदारी अर्जदारावर टाकता येणार नाही.

११. अर्जदाराच्या विधिज्ञांनी केलेला सदर तोंडी युक्तीवाद विचारात घेतला. अर्जदाराच्या विधिज्ञांच्या युक्तीवादावरुन सदर जप्त जनावरे गोशाळेत ठेवण्यात आलेली आहेत. सद्य स्थितीत जनावरांच्या ताब्याबाबत अर्जदार अथवा अन्य

इसमांनी मागणी केलेली नाही. सदर जप्त गोवंशाचे मालक अथवा ताबेदार याबाबत कोणतेही कथन करण्यात आलेले नाही. तथापि, प्राण्यांचा छळ व निर्दयतेने वागणूक प्रतिबंध अधिनियमाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या नियमावलीतील नियम क्र.५ नुसार वाहनाचा मालक देखील जप्त जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चासाठी जबाबदार धरला जाऊ शकतो.

१२. सद्य स्थितीत अर्जदाराव्यतिरीक्त सदर जप्त जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चासाठी अर्जदार जबाबदार धरला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत सदर जप्त जनावरांच्या काळजी व निगेसाठी झालेल्या खर्चाबाबत योग्य तो आदेश करुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य*** या न्याय निवाड्यातील निर्देशानुसार, तपासकामी सहकार्य करणे व वेळोवेळी सदरील वाहन पोलीसांच्या तपासात हजर करणे अशी अट घालून सदर वाहन परत करण्यास कोणतीही बाधा नाही असे दिसते. त्यामुळे सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा देते वेळी संबंधीत गोशाळेस जप्त जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चापोटी नियमानुसार खर्च देण्याबाबत आदेश करणे देखील आवश्यक व गरजेचे आहे. गोशाळेच्या वतीने मोठया जनावरांकरीता प्रतीदिन र.रु.४००/– व छोट्या जनावरांकरीता प्रतिदिन र.रु.३००/– इतका खर्च होत असल्याचे कथन करण्यात आलेले आहे. तथापि, सदर गोशाळेस त्यांच्या कथनाप्रमाणे जनावरांच्या निगा व देखभालीसाठी खर्च येत असल्याचे कोणताही कागदोपत्री पुरावा वादपटलावर नाही. त्यामुळे सदर गोशाळेस मोठ्या जनावरांकरीता प्रतिदिन र.रु.२००/– व छोट्या जनावरांकरीता प्रतिदिन र.रु.१००/– याप्रमाणे निगा व देखभालीचा खर्च नियमाप्रमाणे देण्याबाबत आदेश केला जाऊ शकतो. प्रस्तुत गुन्हयात एकूण १९ मोठी जनावरे व ४ छोटी जनावरे जप्त असल्याचे दिसून येते. त्यामुळे वरील विवेचनानुसार अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीवर सदरील जप्त वाहनाचा ताबा देणे उचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार बाबासाहेब तुकाराम बेरड यास पोलीस स्टेशन, कर्जत गु.र.नं. ५४/२०२६ चे गुन्हयातील जप्त वाहन टाटा मोटर्स लिमीटेड वाहनाचा नोंदणी क्र. MH-16-CD-1990, चॅसीस नंबर MAT563012N7A00435, इंजिन नंबर 33LNGD06AXX500452 व रंग BRICK RED या वाहनाचा अंतरीम ताबा पुढील अटींवर देण्यात येत आहे.

अ) अर्जदाराने रक्कम रू.१६,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख रु.फक्त) चे वाहन निरक्षणग्राही बंधपत्र द्यावे.

ब) अर्जदाराने मुळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर वाहनाच्या मुळ स्वरूप, रंग यात बदल करावयाचा नाही. तसेच सदर वाहन अन्य कोणासही हस्तांतरीत अथवा तबदिल करावयाचे नाही.

क) अर्जदाराने सदर वाहनाचा वापर अर्जात नमूद प्रकारच्या गुन्हयांमध्ये करायचा नाही, तसेच न्यायालय अथवा तपासी अधिकारी निर्देश करतील त्याप्रमाणे हजर ठेवण्याचे आहे.

ड) अर्जदाराने प्रस्तुत गुन्ह्यातील गावरान जातीचे ०३ बैल व ०१ गाय, गिर जातीच्या ०२ गायी, जर्सी जातीच्या १३ गायी अशा एकूण १९ मोठया जनावरांकरीता प्रती जनावरास प्रतिदिन र.रु.२००/- व ०४ छोट्या प्रती जनावरास प्रतिदिन र.रु.१००/- याप्रमाणे सदर जप्त जनावरांचा ताबा

दिल्याच्या तारखेपासून ते प्रस्तुत आदेशाचे दिनांकापर्यंत होणारी रक्कम  जनजागृती सामाजिक युवा प्रतिष्ठान अंतर्गत कामधेनु गोशाळा, राशीन, ता. कर्जत, जि. अहमदनगर या गोशाळेस द्यावी.

३. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देतेवेळी सदर वाहनाचा नोंदणीकृत नंबर, चेसीस नंबर व इंजीन नंबरचा दर्शनी भाग दिसावा असे फोटो काढून फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो बंधपत्रासोबत तपासी अंमलदार यांनी न्यायालयात दाखल करावे.

४. अर्जदाराने बंधपत्र तपासी अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करावे. अर्जदाराने तपासी अधिकारी यांना सहकार्य करावे.

५. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

SHIVAJI N THAPEKAR

Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.03.24 12:19:44 +0530

कर्जत. (एस.एन.थापेकर)

ता.२३/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (कोर्ट क्र.१),कर्जत.

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | **श्री. एस. एन. थापेकर**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>न्यायालय क्र.१, कर्जत, जि.अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नाव | : | **वैभव गो. घोगरे**<br>लघुलेखक (श्रेणी–३). |
| न्यायनिर्णय दिनांक | : | २३/०३/२०२६ |